व्यंकटेश महाविद्यालयात रोजगार मेळावा संपन्न

महाराष्ट्र राज्य शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता योजनेअंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्र, कोल्हापूर व आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र, श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा' व्यंकटेश महाविद्यालयामध्ये संपन्न झाला. कार्यक्रमांमध्ये मा श्री. जमीर करीम, सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, कोल्हापूर यांनी कार्यक्रमांमध्ये रोजगार मेळाव्याचे प्रास्ताविक केले. इचलकरंजी शहर व तसेच इतर आजूबाजूच्या खेडेगावांमध्ये असणारे विविध शिक्षित पदवीधर, पदव्युत्तर पदवीधर, तसेच दहावी, बारावी उत्तीर्ण व अशिक्षित तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी व शिक्षणासोबत विविध प्रकारचे कौशल्य अंगी निर्माण व्हावे यासाठी महाराष्ट्र राज्य शासनातर्फे कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता योजनेअंतर्गत श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये येथे आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यात आले असून आज पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. तरुणांच्या जवळ शिक्षण आहे पण पुरेसे कौशल्य अंगी उपलब्ध नसल्यामुळे अनेक नोकरीच्या संधी त्यांना उपलब्ध होत नाहीत त्यामुळे कौशल्य विकास घडवून रोजगारक्षम युवक व युवती निर्माण करण्याच्या आणि रोजगारामध्ये वाढ घडवून आणण्याच्या उद्देशाने अनेक योजना महाराष्ट्र राज्य शासनातर्फे राबवल्या जात आहेत असे ते म्हणाले. श्री. दीपक शिंदे, उप-विभागीय अधिकारी, इचलकरंजी श्री ना.बा. एज्युकेशन सोसायटीचे कोषाध्यक्ष श्री. महेश बांदवलकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.ए.माने, इत्यादी मान्यवर कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित होते. घाडगे पाटील इंडस्ट्रीज लि., मौर्य ग्लोबल, नक्षत्र सेल्स अँड सर्विसेस, करवीर क्रिएशन, हुंडीया इन्फोटेक, गणेश बेकरी नांदणी, आस्क इंजिनियर, जीनियर इंडस्ट्री, स्टेट बँक ऑफ इंडिया लाइफ इन्शुरन्स, ॲक्सिस बँक, एचडीएफसी बँक, एलआयसी ऑफ इंडिया, अशा विविध वीस उद्योग संस्था, बँकिंग संस्था व इन्शुरन्स संस्था अशा एकूण 20 पेक्षा जास्त कंपन्या रोजगार मेळाव्यामध्ये उपस्थित होत्या. 400 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. त्यांनी सेल्स एक्झिक्यूटिव्ह, डेव्हलपमेंट मॅनेजर, क्वालिटी सुपरवायझर, क्लर्क, एजन्सी मॅनेजर, सीएनसी, व्हीएमसी मशीन ऑपरेटर, ब्रांच मॅनेजर, सेक्रेटरी, असिस्टंट अकाउंटंट, रिलेशनशिप मॅनेजर, अशा विविध पदांकरिता या रोजगार मेळाव्यामध्ये मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मोहिनी आंचलिया व कार्यक्रमाचे आभार डॉ. बी. एन. कांबळे यांनी केले. रोजगार मेळाव्यासाठी मोठ्या प्रमाणात

युवक व युवती उपस्थित होते. महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य सदर मेळावा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मिळाले.

